नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 । पाने : ४ । वर्ष : ४ थे । अंक : २४०। किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक
# समर्थ गांवकरी
संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे    POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




गुरुवार दि. १३ ऑगस्ट २०२६
मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

## ‘पेपरफूट, परीक्षा गैरप्रकार संदर्भात केंद्राचा कायदा राज्यात लागू करणार’

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस; भरती परीक्षापद्धतीत सुधारणांसाठी राज्यात उच्चस्तरीय समिती

**मुंबई (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्रात विविध सेवाभरतींसाठी होणार्या परीक्षा पद्धतीत सर्वसमावेशक, अधिक सुरक्षित आणि सर्वसंमतीने सुधारणांसाठी एक उच्चस्तरीय समिती गठीत करण्याचा निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी घेतला. या समितीने राज्यात प्रत्येक विभागात जाऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधत सर्वंकष सुधारणांबाबत अहवाल सादर करायचा आहे. पेपरफूट, परीक्षा गैरप्रकार संदर्भात केंद्राचा कायदा राज्यात लागू करणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

वर्षा निवासस्थानी आयोजित या बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेसुद्धा उपस्थित होते, त्यांनीही अनेक उपयुक्त सूचना या बैठकीत केल्या. मुख्यमंत्र्यांनी गठीत केलेली उच्चस्तरीय समिती सामान्य प्रशासन विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव व्ही. राधा यांच्या अध्यक्षतेत राहणार असून राज्याचे पोलीस महासंचालक सदानंद दाते, माहिती-तंत्रज्ञान विभागाचे सचिव वीरेंद्र सिंग, पशुसंवर्धन विभागाचे सचिव डॉ. एन. रामास्वामी आणि नाशिक विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम यांचा त्यात समावेश असेल. या समितीने प्रत्येक महसुली विभागात जाऊन विद्यार्थी, शिक्षण संस्थाचालक आणि संबंधित घटकांशी चर्चा करून त्यांची मते जाणून घ्यायची आहेत. त्याआधारावर राज्यासाठीचे समग्र धोरण ठरेल.

अलिकडेच केंद्र सरकारने पेपरफूट आणि परीक्षा गैरव्यवहारासंदर्भात संसदेत एक कायदा केला आहे. महाराष्ट्राचाही स्वतंत्र कायदा आहेच. तथापि संसदेने केलेला कायदा अधिक कठोर असल्याने तो महाराष्ट्रातही लागू करण्यासंदर्भात येणार्या पंधरवड्यात प्रक्रिया पूर्ण करण्यात यावी, असेही निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी दिले.



**राज्यात २५ हजार क्लासरूम उभारणार**

राज्यात किमान २५ हजार सुरक्षित क्लासरुम उभारण्यात याव्यात, असेही निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या बैठकीत दिले. या विविध परीक्षांमध्ये जिल्हाधिकारी, पोलीस आयुक्त, पोलीस अधीक्षक, शिक्षण विभागाचे वरिष्ठ अधिकारी यांचीही समन्वय भूमिका, इतर विविध देशांमधील परीक्षा पद्धती, विद्यमान प्रक्रिया आणि त्यातील विविध संभाव्य सुधारणा अशा अनेक विषयांवर यावेळी सांगोपांग चर्चा झाली. राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल आणि इतर वरिष्ठ अधिकारी या बैठकीला उपस्थित होते.

## राज्यात अद्यापही १ कोटी ८० लाख ६० हजार मतदार ‘एसआयआर’बाहेर

### ७७ टक्के मतदारांकडून प्रक्रिया पूर्ण; शहरी भागात अनास्था, १७ ऑगस्टला संपणार मुदत

**मुंबई (समर्थ गांवकरी)**




देशभरात सुरू असलेल्या मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमात (एसआयआर) महाराष्ट्रातील सुमारे ७७.७७ टक्के मतदारांचे डिजिटायझेशन पूर्ण झाले असले, तरी अद्यापही राज्यातील तब्बल १ कोटी ८० लाख ६० हजार ६९७ मतदार या प्रक्रियेबाहेर राहिल्याची माहिती समोर आली आहे. या उर्वरित मतदारांना ही प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी १७ ऑगस्ट २०२६ पर्यंतचीच अंतिम मुदत शिल्लक आहे. राज्याचे अपर मुख्य सचिव तथा मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोकलिंगम् यांनी बुधवारी मंत्रालयात आयोजित पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. (SIR)

निवडणूक आयोगाच्या आकडेवारीनुसार, राज्यात १८ जून २०२६ पर्यंत एकूण ९ कोटी ७८ लाख ५४ हजार ४९ मतदार नोंदणीकृत आहेत. यापैकी ७ कोटी ६० लाख ९८ हजार १५३ मतदारांचे स्वाक्षरीसह गणना प्रपत्र गोळा करून त्यांचे डिजिटायझेशन यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आले आहे. मात्र, उर्वरित १८.४६ टक्के म्हणजेच १ कोटी ८० लाख ६० हजार ६९७ मतदारांची गणना प्रपत्रे अद्याप जमा होऊ शकलेली नाहीत. या प्रक्रियेबाहेर राहिलेल्या संवर्गामध्ये प्रामुख्याने गैरहजर, स्थलांतरित, मृत आणि दुबार मतदारांचा समावेश आहे. विशेष म्हणजे, शहरी भागांमध्ये मतदारांची ही अनास्था अधिक असून, ठाणे, नागपूर, मुंबई, पुणे, पालघर आणि रायगड या जिल्ह्यांत प्रक्रियेबाहेर असलेल्या मतदारांचे प्रमाण सर्वाधिक असल्याचे चोकलिंगम् यांनी स्पष्ट केले.

मतदारांकडून गणना प्रपत्र जमा करण्याचा अंतिम दिनांक १७ ऑगस्ट २०२६ हा असेल. त्यानंतर २४ ऑगस्ट २०२६ रोजी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध केली जाईल. या प्रारूप यादीवर दावे व हरकती दाखल करण्यासाठी २४ ऑगस्ट ते २३ सप्टेंबर २०२६ हा एक महिन्याचा कालावधी दिला जाईल. प्राप्त झालेल्या दावे व हरकती निकालात काढण्याची मुदत २४ ऑगस्ट ते २२ ऑक्टोबर २०२६ अशी असेल, तर अखेर २७ ऑक्टोबर २०२६ रोजी राज्याची अंतिम मतदार यादी प्रसिद्ध केली जाणार आहे.

## प.पू.श्री आनंद ऋषीजी म. सा. यांच्या जन्मोत्सवाची माणिकदौंडी येथून उत्साहात सुरुवात



**पाथर्डी (समर्थ गांवकरी)**

श्री आनंद ऋषीजी महाराज साहेब यांच्या जन्मोत्सव सोहळ्याचा शुभारंभ माणिकदौंडी येथून मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात दि.१२ ऑगस्ट रोजी करण्यात आला. जन्मोत्सव प्रारंभ रथाचे पूजन करून मान्यवरांच्या हस्ते श्रीफळ वाढवून सोहळ्याचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी श्री तिलोक जैन ज्ञान प्रसारक मंडळाचे सचिव सतिश गुगळे, खजिनदार सुरेश कुचेरिया, कार्यकारणी सदस्य संपतलाल गांधी, श्री रत्न जैन विद्यालयाचे मुख्याध्यापक सुदाम मरकड, आश्रम शाळा मुख्याध्यापक शंकर राठोड, अधीक्षक सदानंद सुतार, माणिकदौंडी सरपंच शायदभाई पठाण,उपसरपंच समीर पठाण, सदस्य बाळासाहेब कांबळे, संपत गायकवाड, गौतम पटवा, पोलीस पाटील वसंत वाघमारे, शिवाजीराव मोहिते पाटील, विद्यालयातील शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी आदींची उपस्थिती होती. यावेळी आकर्षक व भव्य शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले. शोभायात्रेत लेझीम पथक, झांज पथक, टिपरी पथक, काठी पथक तसेच कलशधारी मुली सहभागी झाल्या होत्या. पारंपरिक वेशभूषेतील मुला-मुलींच्या कलाविष्काराने आणि ढोल-ताशांच्या गजराने संपूर्ण परिसर भक्तिमय व उत्साहपूर्ण वातावरणाने भारावून गेला.

शोभायात्रेतील विविध पथकांनी सादर केलेल्या पारंपरिक कार्यक्रमांनी उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. कलशधारी मुलींची आकर्षक उपस्थिती तसेच लेझीम, झांज व टिपरी पथकांच्या तालबद्ध सादरीकरणामुळे शोभायात्रेला विशेष आकर्षण प्राप्त झाले.

या जन्मोत्सव सोहळ्यासाठी भाविक, नागरिक तसेच विविध मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. श्रद्धा, भक्ती आणि उत्साहाच्या वातावरणात माणिकदौंडी येथून जन्मोत्सवाची सुरुवात झाल्याने परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

श्री आनंद रथयात्रेतील लेझीम, झांज, टिपरी, लाठीकाठी, कलश पथकांचे तालबद्ध आणि देखणे सादरीकरण होण्यासाठी श्री रत्न जैन विद्यालयाचे मुख्याध्यापक, शिक्षक- शिक्षकेतर कर्मचारी यांनी मोलाची मेहनत घेतली.

## माळीझाप अकोले संत सावता महाराज पुण्यतिथी निमित्त ६७ वा सप्ताह सांगता

**अकोले (समर्थ गांवकरी)**

माळीझाप अकोले श्री संत शिरोमणी सावता महाराज मंदिरात गेल्या सात दिवस काकडा भजन, गाथा भजन, हरिपाठ, भजन व जागर,ज्ञानेश्वरी पारायण, श्रीहरि किर्तन, असे आयोजन करण्यात आले होते.

बुधवारी रोजी दुपारी १ ते ४ माळीझाप अकोले शहरातून ग्रंथराज ज्ञानेश्वरी व संत सावता महाराज यांच्या प्रतिमेची रथातून अत्यंत भव्य भक्तीमय वातावरणात मिरवणूक काढण्यात आली. पारंपरिक वाद्यांचा गजर महिला व पुरुषांनी पारंपरिक वाद्यांच्या तालावर फुगड्या खेळत मोठा आनंद लुटला महिला डोक्यावर कलश व टाळ महिला भगिनींनी मिरवणुकीचे मुख्य आकर्षण करून सोहळ्याची शोभा वाढवली.

काल्याच्या किर्तनात ह.भ.प. राजेंद्र महाराज सदगीर यांनी ’कांदा मुळा भाजी अवघी विठाई माझी’ या अभंगातून श्री संत सावता महाराज यांचा पूर्ण प्रामाणिक कर्म आणि भक्ती शक्तीचा सुंदर आदर्श ठेवला शेतात राब,राबत असताना सतत मुखी पांडुरंग विठ्ठलाचे नाम स्मरण करत ते कधी पंढरपूरला वारीला गेले नाही स्वतः पांडुरंग भगवान हे सावता माळी यांच्या भेटीला अरण भेटी (सोलापूर) सावता माळी यांच्या मळ्यात आले.

गौळण सांगती, गौळणीला, गौळण सांगती गौळणीला पुत्र झाला यशोधिला भगवान परमात्मा सांगू लागला भगवान श्रीकृष्णाचे अनेक रूपे आणि दृष्टांत देऊन भाविकांना मंत्र मुक्त केले व काल्याच्या किर्तनानंतर अकोले परिसरातील सर्व भाविक भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.



## नागलवाडी ता. शेवगाव येथील दरोड्याची उकल करुन आरोपीस २१ तोळे मुद्देमालासह अटक

**(समर्थ गांवकरी)**

दि.१३/०३/२०२६ रोजी रात्री ११/४५ वा. चे सुमारास यातील यातील फिर्यादी हें त्यांच्या रहात्या घरी झोपलेले असताना अनोळखी इसमांनी यांनी घरात घुसून फिर्यादीच्या गळ्याला चाकू लावून बळजबरीने कपाटातील ५५ तोळे सोन्याची दागिने व एक लाख रुपये रोख रक्कम चोरून घेऊन गेले त्यावरुन फिर्यादी नामे राम मारुती गिते वय ६५ वर्षे रा. नागलवाडी ता. शेवगाव जि. अहिल्यानगर यांचे फिर्यादीवरुन शेवगाव पोस्टे गुरनं २१३/२०२६ भा.न्या.सं.कलम ३०९ (४) प्रमाणे दि.१४/०३/२०२६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयातील आरोपी नामे १) राम कृष्ण चव्हाण, २) करण रामनाथ भोसले, ३) ओमकार पांडुरंग दहीवाळ यांना सदर गुन्ह्यात स्थानिक गुन्हे शाखा यांना अटक करुन शेवगाव पोलीसांचे ताब्यात दिल्यानंतर त्यांचेकडे सदर गुन्ह्याचे अनुषंगाने चौकशी केली असता अटक आरोपींनी सदर गुन्हा करतांना आमचे बरोबर राहुल रज्ञाक काळे हा देखील होता. त्यानंतर सदर गुन्ह्याचे तपासकामी राहुल रज्ञाक काळे यास दिनांक ०५/०८/२०२६ रोजी अटक करुन त्याचेकडे सखोल चौकशी केली असता त्याने सदर गुन्ह्यातील गेले मालाबाबत माहीती सांगुन गुन्ह्यातील गेले मालातील २१ तोळे सोने हस्तगत करण्यात आले आहे.




सदरची कारवाई ही मा. पोलीस अधीक्षक श्री मुम्मका सुदर्शन सो अहिल्यानगर, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. वैभव कलुबर्मे अहिल्यानगर, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. नीरज राजगुरू सो उपविभाग शेवगांव यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि. श्री मोहन बोरसे सो, पोसई बाजीराव सानप, पोकॉ ईश्वर बेरड, पोकॉ शाम गुंजाळ, पोकों एकनाथ गर्कळ, पोकॉ राजु बडे, पोकों राहुल आठरे, पोकॉ प्रशांत आंधळे, पोकों राहुल खेडकर, पोकों, सचिन पिरगळ, अर्जुन ढवळे व सायबर सेल चे राहुल गुड्डु, अर्जुन सांगळे यांनी केली असुन गुन्ह्याचा पुढील तपास वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली पोसई बाजीराव सानप हे करत आहेत.

## मा. खासदार विखे- आमदार दातेंच्या पाठपुराव्याला यश

### पारनेरमधील तीन महत्त्वपूर्ण पुलांसाठी ७ कोटी ६८ लाखांची मंजुरी

**पारनेर (समर्थ गांवकरी)**

बुधवार दि. १२ ऑगस्ट २०२६ पारनेर तालुक्यातील दळणवळणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा असलेल्या गारखिंडी ते अळकुटी ते पाबळ ते निघोज मार्गावरील पुलांसह डिकसळ - जामगाव मार्गावरील पुलाच्या बांधकामाला प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत तब्बल ७ कोटी ६८ लाख ३३ हजार रुपयांची मंजुरी मिळाली आहे. माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांच्या कार्यकाळापासून प्रलंबित असलेल्या या कामांसाठी पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सर यांनी पदभार स्वीकारल्यानंतर सातत्याने पाठपुरावा केल्याने या कामांना अखेर मंजुरी मिळाली आहे.

या संदर्भात माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील आणि आमदार काशिनाथ दाते सर यांनी मंत्रालय, मुंबई येथे ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांची भेट घेऊन संबंधित कामांच्या मंजुरीसाठी पाठपुरावा केला. त्यानंतर प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेच्या दि. १३ जुलै २०२६ रोजीच्या मंजुरी पत्रानुसार पारनेर तालुक्यातील या तीन पुलांच्या कामांना प्रशासकीय मंजुरी मिळाल्याची माहिती संबंधित अधिकाऱ्यांकडून देण्यात आली.

मंजूर कामांमध्ये डिकसळ ते जामगाव रस्त्यावरील चेनज ४+२५० येथे पुलाच्या बांधकामासाठी २ कोटी ६६ लाख ४२ हजार रुपये, गारखिंडी ते अळकुटी ते पाबळ ते निघोज रस्त्यावरील चेनज ०+७०० येथे पुलासाठी २ कोटी ८४ लाख ७५ हजार रुपये, तर याच मार्गावरील चेनज १+२०० येथे पुलाच्या बांधकामासाठी २ कोटी १७ लाख १६ हजार रुपये मंजूर करण्यात आले आहेत. या तिन्ही कामांची एकूण मंजूर किंमत ७ कोटी ६८ लाख ३३ हजार रुपये इतकी आहे.

माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी या पुलांची गरज लक्षात घेऊन प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेतून कामे मंजूर होण्यासाठी केलेल्या प्रारंभिक पाठपुराव्याला आमदार काशिनाथ दाते सरांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांची जोड मिळाली. आमदार दाते यांनी विधानसभेचे सदस्य म्हणून पदभार स्वीकारल्यानंतर संबंधित कामांचा सातत्याने पाठपुरावा करत ही कामे मार्गी लावण्यासाठी प्रयत्न केले. त्यामुळे अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेल्या या कामांना आता प्रत्यक्ष मंजुरी मिळाली आहे.

या मंजुरीबद्दल आमदार काशिनाथ दाते सर यांनी मतदारसंघातील जनतेच्या वतीने पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार, ग्राम विकास मंत्री जयकुमार गोरे तसेच जलसंपदा मंत्री व अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्यासह केंद्र व राज्य शासनाचे विशेष आभार मानले आहेत.

> मा. खा. डॉ. सुजय विखे पाटील यांच्या कार्यकाळात प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेतून मंजूर झालेले दोन्ही रस्ते पूर्ण झाले; मात्र त्यावरील आवश्यक पुलांची कामे प्रलंबित राहिली होती. या पुलांची गरज लक्षात घेऊन सातत्याने पाठपुरावा केल्यानंतर अखेर या कामांना मंजुरी मिळाली आहे. केंद्र सरकारचा ६० टक्के व राज्य सरकारचा ४० टक्के निधी मिळून ही कामे पूर्ण होणार असून, यामुळे परिसरातील नागरिकांचे दळणवळण अधिक सुरक्षित व सुरळीत होईल.
>
> **- आमदार काशिनाथ दाते सर (विधानसभा सदस्य)**

पारनेरच्या ग्रामीण भागातील दळणवळण अधिक सक्षम करणे आणि वर्षानुवर्षे प्रलंबित असलेले प्रश्न मार्गी लावणे ही आपली प्राथमिकता आहे. या तीन पुलांच्या मंजुरीमुळे संबंधित परिसरातील नागरिकांची मोठी गैरसोय दूर होणार असून, पुढील काळातही मतदारसंघातील आवश्यक विकासकामांसाठी सातत्याने पाठपुरावा सुरूच राहील, असा विश्वास आमदार काशिनाथ दाते सर यांनी व्यक्त केला.



# अखेर शिक्षकेतर पदभरतीचा मार्ग मोकळा!

## शिवाजीराव खांडेकर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश



अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

महाराष्ट्रातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाची आणि दिलासादायक बातमी समोर आली असून, अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या शिक्षकेतर पदभरतीचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे. महाराष्ट्र राज्य शिक्षकेतर संघटनांचे महामंडळाचे सरकार्यवाह शिवाजीराव खांडेकर यांनी शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी सातत्याने केलेल्या पाठपुराव्याला अखेर यश आले आहे.

शिक्षण व्यवस्थेसाठी महत्त्वाचा निर्णय

शाळा व शैक्षणिक संस्थांमध्ये मोठ्या प्रमाणावर शिक्षकेतर पदे रिक्त असल्यामुळे कार्यरत कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त कामाचा ताण पडत असून, त्याचा परिणाम प्रशासकीय कामकाजावर होत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आणून देण्यात आले.शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रश्नाची गांभीर्याने दखल घेत शिक्षक भरती प्रक्रिया ज्या पद्धतीने सुरू करण्यात आली आहे, त्याचप्रमाणे अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेली शिक्षकेतर पदभरती तातडीने सुरू करण्यात येईल,असे आश्वासन प्रधान सचिवांनी शिवाजीराव खांडेकर यांना दिले होते. संघटनेच्या पाठपुराव्याला यश– पुणे विभागीय सचिव गोवर्धन पांडुळे म्हणाले, शासनासोबत केलेला सातत्यपूर्ण पत्रव्यवहार, विविध बैठका आणि पदभरतीचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी केलेल्या अथक प्रयत्नांनंतर शासनाने शिक्षकेतर पदभरतीसंदर्भात महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे.संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांना साथीत घेऊन शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे विविध प्रश्नावर सातत्याने आवाज उठवत आहेत.

दि.५ ऑगस्ट २०२६ रोजी शासनाचे प्रधान सचिव यांच्यासोबत झालेल्या बैठकीत शिवाजीराव खांडेकर यांनी शिक्षकेतर पदभरतीचा प्रश्न ठामपणे मांडला. राज्यात शिक्षक भरतीची प्रक्रिया सुरू करण्यात आली असताना गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेली शिक्षकेतर पदभरती देखील तातडीने सुरू करण्यात यावी.अशी आग्रही मागणी श्री.खांडेकर यांनी केली.

संघर्षाला यश मिळाले

राज्य अध्यक्ष अनिल माने म्हणाले,या आश्वासनानंतर शासनाने दि.११ ऑगस्ट २०२६ रोजी शिक्षकेतर पदभरती संदर्भातील शासन निर्णय निर्गमित करून भरती प्रक्रियेचा मार्ग मोकळा केला आहे.या शासन निर्णयानुसार कनिष्ठ लिपिक,पूर्णवेळ ग्रंथपाल आणि प्रयोगशाळा सहाय्यक या संवर्गातील पदे नियमानुसार भरण्यास शासनाने मान्यता दिली आहे. त्यामुळे अनेक वर्षांपासून रिक्त असलेल्या पदांवर भरती होण्याचा मार्ग खुला झाला असून,शिक्षकेतर कर्मचारी तसेच या पदांसाठी पात्र असलेल्या उमेदवारांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

शिक्षण व्यवस्था प्रभावीपणे चालविण्यामध्ये शिक्षकांबरोबरच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भूमिकाही अत्यंत महत्त्वाची आहे. शाळेतील कार्यालयीन कामकाज,विद्यार्थी नोंदी, ग्रंथालय व्यवस्था, प्रयोगशाळेतील काम काज तसेच विविध प्रशासकीय जबाबदाऱ्या शिक्षकेतर कर्मचाऱ्यांकडून पार पाडल्या जातात.मात्र,अनेक वर्षांपासून पदे रिक्त असल्याने उपलब्ध कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त कामाचा भार पडत होता.त्यामुळे शिक्षकेतर पदभरतीचा शासन निर्णय हा शैक्षणिक क्षेत्राच्या दृष्टीनेही महत्त्वाचा मानला जात आहे. या निर्णयामुळे राज्यातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण असून, शिक्षकेतर पदभरतीसाठी सातत्याने संघर्ष करणाऱ्या संघटनांच्या प्रयत्नांना मोठे यश मिळाले आहे. हा विजय महाराष्ट्रातील तमाम शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या एकजुटीचा, सातत्यपूर्ण संघर्षाचा आणि न्याय्य हक्कांसाठी केलेल्या अथक प्रयत्नांचा विजय असल्याची भावना व्यक्त करण्यात येत आहे.या ऐतिहासिक यशासाठी महाराष्ट्र राज्य शिक्षकेतर संघटनांचे महामंडळाचे सरकार्यवाह शिवाजीराव खांडेकर यांचे महाराष्ट्रातील सर्व शिक्षकेतर कर्मचारी बंधू–भगिनींच्या वतीने हार्दिक अभिनंदन करण्यात येत असून,त्यांच्या सातत्यपूर्ण नेतृत्वाबद्दल मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले आहेत.

# श्रीरामपूरमध्ये पोलिसांचे 'ऑल आऊट ऑपरेशन'; १२ फरार आरोपी जेरबंद, ४० दारूबंदीचे गुन्हे दाखल!

श्रीरामपूर (समर्थ गांवकरी)

श्रीरामपूर विभागातील १७ पोलीस ठाण्यांच्या हद्दीत ११ ऑगस्ट रोजी पोलिसांनी 'ऑल आऊट ऑपरेशन' व विशेष कोंबिंग मोहीम राबवत मोठी कारवाई केली. या मोहिमेत अनेक वर्षांपासून फरार असलेल्या १२ आरोपींना जेरबंद करण्यात आले. तसेच दोन सराईत गुन्हेगारांकडून धारदार तलवारी जप्त करून शस्त्र कायद्यान्वये गुन्हे दाखल करण्यात आले. श्रीरामपूर शहरात एका कारवाईत चार किलो गांजा व कार असा सुमारे ५ लाख ६० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.





शहरातील बेकायदेशीर भंगार दुकानांवरही पोलिसांनी विशेष लक्ष केंद्रित केले. विविध दुकानांची पंचांसमक्ष तपासणी केली असता मोठ्या प्रमाणावर संशयास्पद वाहने व वाहनांचे सुटे भाग आढळून आले. यामध्ये कार, ट्रॅक्टर, इंजिन, गिअर बॉक्स, दरवाजे, टायर, काचा, दिवे, रेडिएटर तसेच वाहनांच्या बॉडींचा समावेश आहे. वाहनांबाबत मालकी हक्काची कागदपत्रे किंवा समाधानकारक स्पष्टीकरण न दिल्याने सहा भंगार व्यावसायिकांविरुद्ध महाराष्ट्र पोलीस अधिनियमातील कलम १२४ नुसार चार स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या वाहनांचा स्रोत, खरेदी–विक्री आणि संबंधित कागदपत्रांचा पुढील तपास न्यायालयाच्या परवानगीने करण्यात येणार आहे. दरम्यान, अवैध दारू विक्री व वाहतुकीविरोधात ४० गुन्हे दाखल करण्यात आले असून मटका व जुगारप्रकरणी १८ गुन्हे दाखल करण्यात आले. न्यायालयीन प्रक्रियेत १०० अजामीनपात्र वॉरंटची अंमलबजावणी करून आरोपींना न्यायालयात हजर करण्यात आले, तर १४६ जामीनपात्र वॉरंटची बजावणी करण्यात आली. विविध प्रकरणांतील ३३८ समन्सचीही बजावणी करण्यात आली. वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांविरुद्ध ३२२ कारवाया करून २ लाख ५ हजार ५०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला, तर मद्यप्राशन करून वाहन चालविणाऱ्या तिघांवर कारवाई करण्यात आली. अल्पवयीन मुलींचे अपहरण व विनयभंगाच्या घटनांना प्रतिबंध करण्यासाठी शहरातील कॅफे व कॅन्टीनचीही तपासणी करण्यात आली.

# मराठा अधिकारी-कर्मचारी संघाच्या राष्ट्रीय अधिवेशनाला उत्स्फूर्त प्रतिसाद

नेवासा (समर्थ गांवकरी)




मराठा अधिकारी व कर्मचारी संघ, भारत यांच्या वतीने आयोजित प्रथम राष्ट्रीय अधिवेशन नेवासा तालुक्यातील प्रवरासंगमयेथे नुकताच उत्साहाच्या वातावरणात पार पडला. यानिमित्ताने झालेल्या अधिवेशनात समाज मेळाव्यासह व्याख्यानाद्वारे प्रबोधन जनजागृती तसेच गुणवंत पाल्य व समाज सेवकांचा सन्मान करत रक्तदान आदी उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.प्रबोधन, सामाजिक बांधिलकी आणि समाजहिताचा संदेश देणाऱ्या विविध उपक्रमांना यावेळी उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला

झालेल्या अधिवेशनात डॉ.अजय कळमकर,डॉ. बालाजी जाधव,ड. संजय कोतकर,अशोक कुटे यांनी विविध सामाजिक व प्रशासकीय विषयांवर मार्गदर्शन केले. सामाजिक एकोपा, शिक्षण, संघटन आणि समाजाच्या सर्वांगीण विकासाबाबत यावेळी मार्गदर्शन करण्यात आले. रक्तदान शिबिरातून सामाजिक बांधिलकी जपण्याचा संदेश देण्यात आला.

यावेळी विविध शैक्षणिक, संशोधन,स्पर्धा परीक्षा, क्रीडा व इतर उल्लेखनीय क्षेत्रांत प्राविण्य मिळविलेल्या गुणवंत पाल्यांचा सन्मान करण्यात आला. यामध्ये डॉ. जयदिप रामदास कुंदे, निरज विकास थोरात, गोविंद जगन्नाथराव कदम, मेधांश मुकुंद पवळ, सार्थक शिवाजी काळे,श्रुती संजय सोमवंशी,विकास नीरज थोरात,अक्षय गणपती लोखंडे,विक्रम घोरपडे,अभिजित शेळके, शिवांश वाघाडे, प्रियांश वाघाडे,ईशान खताळ, सार्थक देशमुख यांचा गौरव करण्यात आला.तसेच समाजासाठी उल्लेखनीय योगदान देणाऱ्या समाजसेवकांचाही यावेळी सन्मान करण्यात आला.

अधिवेशनाच्या यशस्वी आयोजनासाठी संघाचे अध्यक्ष लक्ष्मण खटिंग, उपाध्यक्ष पृथ्वीराज वाघाडे, सचिव अनिल पाटील, तसेच हनुमंत येवले, रावसाहेब जंगले, मुकुंद खिस्ते, प्रमोद पाटील, अनिल बावणे, गोविंद तांगडे, मुंजा गिराम, कृष्णा दुधाटे, गोवर्धन टेमक, गोविंद मुळे, दशरथ ढोले, एकनाथ बेल्हेकर, सचिन पाटील, किसन तुपे, किरण ताकटे, सुरेश कुंदे, तिलोत्तमा मापारी व नंदा गटकळ यांनी सहकार्य केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रेवणनाथ पवार,अर्चना देशमुख व कल्पना कानडे यांनी केले.

रक्तदान शिबिरासाठी छत्रपती संभाजीनगर येथील विभागीय रक्त केंद्र, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (घाटी) येथील रक्तपेढीचे विशेष सहकार्य लाभले. अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे, उपअधिष्ठाता डॉ. भारत सोनवणे आणि डॉ. अंजली कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच डॉ. शुभम गुसिंगे, डॉ. झोहरा, डॉ. नम्रता राठोड, तंत्रज्ञ पाध्ये, समुपदेशक कोकिळा साबळे, अंजली कुशल, संदीप, सरफराज आणि मजहर शेख यांनी रक्तदान शिबिरासाठी सहकार्य केले.

# आदिवासी विद्यार्थ्यांनी मोठी स्वप्ने पाहून ती शिक्षणाच्या बळावर साकारावीत : आमदार विवेकभैय्या कोल्हे

## संजीवनीच्या आदिवासी आश्रमशाळेत आदिवासी दिन साजरा

कोपरगाव (समर्थ गांवकरी)

आदिवासी विद्यार्थ्यांनी मोठी स्वप्ने पाहावीत आणि शिक्षणाच्या बळावर ती साकार करावीत. संजीवनी सारख्या संस्थेचे पाठबळ घेऊन भविष्यात देशातील उच्च पदांवर पोहोचत कोपरगाव तालुक्याचे नाव उज्वल करावे, असे आवाहन विधान परिषद सदस्य आमदार विवेकभैय्या कोल्हे यांनी केले. तसेच शासकीय व अनुदानित

आश्रमशाळांसमोरील विविध प्रश्नांकडे जातीने लक्ष घालून शासनदरबारी पाठपुरावा करण्याची ग्वाही त्यांनी दिली.

संजीवनी ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्स संचलित कोपरगांव तालुक्यातील टाकळी येथिल एकलव्य आदिवासी अनुदानित आश्रमशाळेत जागतिक आदिवासी दिन उत्साहात साजरा करण्यात आला. आदिवासी संस्कृती, कला व परंपरांचे जतन करत विध्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला शिक्षणाची जोड देण्याचा संजीवनी ग्रामीण शिक्षण संस्थेचा दृष्टिकोन यावेळी अधोरेखित झाला. यावेळी आमदार विवेकभैय्या कोल्हे यांनी संजीवनीच्या कार्यपरंपरेचा गौरव केला. स्वर्गीय सहकारमहर्षी माजी मंत्री शंकररावजी कोल्हे यांनी समाजकारण व शिक्षण क्षेत्रात निर्माण केलेला वसा आज अध्यक्ष श्री नितीनदादा कोल्हे आणि कार्यकारी विश्वस्त श्री अमित कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली विश्वस्त सुमित कोल्हे तळमळीने पुढे नेत असल्याचे त्यांनी सांगितले. आदिवासी विध्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण व योग्य संधी मिळाल्यास ते राष्ट्रीय पातळीवर स्वतंत्र ओळख निर्माण करू शकतात, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून उपस्थितांची दाद मिळविली. विद्यार्थ्यांनी साकारलेल्या वारली चित्रांमधून आदिवासी समाजाच्या समृद्ध सांस्कृतिक परंपरा व कला वैभवाचे दर्शन घडले. विद्यार्थ्यांनी शिक्षणामुळे जीवनात झालेला सकारात्मक बदल आणि भविष्यातील ध्येयांविषयी केलेली भाषणेही लक्षवेधी ठरली. सदर




प्रसंगी सुमित कोल्हे यांनी एकलव्य आश्रम शाळेच्या भविष्यातील विकासाची दिशा स्पष्ट केली. संजीवनीच्या इतर शाखांप्रमाणेच टाकळी येथील आश्रमशाळेतही दर्जेदार सोयी–सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. शिक्षणासोबत क्रीडा, सांस्कृतिक उपक्रम व व्यक्तिमत्त्व विकासाच्या संधी देऊन एकलव्य आश्रमशाळेला आदिवासी विध्यार्थ्यांच्या विकासाचे आदर्श रोल मॉडेल बनविण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमास सहकार महर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखान्याचे संचालक निलेश देवकर, गणेश सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष शिवाजीराव लहारे, टाकळीचे सरपंच संदीप देवकर, माजी सभापती सुनील देवकर, पोलीस पाटील राजेंद्रजी देवकर, प्राथमिक विभागचे मुख्याद्यापक आण्णासाहेब टकले , माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका मीरा जोशी, शिक्षक–शिक्षकेतर कर्मचारी, आदिवासी पालक व ग्रामस्थ उपस्थित होते.

# भगवान श्रीगोपालकृष्ण मूर्ती प्रतिष्ठापना व श्री गोकुळाष्टमी सप्ताहाचे आयोजन

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज उपासना संस्थान, चिंतामणी उपासना केंद्र, अहिल्यानगर यांच्या वतीने भगवान श्रीगोपालकृष्ण मूर्ती प्रतिष्ठापना सोहळा तसेच श्री गोकुळाष्टमी सप्ताह रविवार, ३० ऑगस्ट ते शनिवार, ५ सप्टेंबर २०२६ या कालावधीत भक्तिमय वातावरणात आयोजित करण्यात आला आहे.



रविवार, ३० ऑगस्ट रोजी सकाळी ९ ते १०.३० या वेळेत श्रीमद्भगवद्गीतेवरील प्रवचन होणार असून, सकाळी १०.३० ते १ या वेळेत भगवान श्रीगोपालकृष्णांची शोभायात्रा व नगरप्रदक्षिणा चिंतामणी उपासना केंद्रातून काढण्यात येणार आहे.

सोमवार, ३१ ऑगस्ट ते शनिवार, ५ सप्टेंबर दरम्यान पुढील सर्व कार्यक्रम थोरले श्रीराम मंदिर, नेप्ती येथे होणार आहेत. दररोज सकाळी ७.३० ते ९ या वेळेत श्रीमद्भगवद्गीता प्रवचन, तर सायंकाळी ५ ते ७ या वेळेत श्रीएकनाथी भागवत कथा आयोजित करण्यात आली आहे. सप्ताहभर २४ तास अखंड पहारा राहणार आहे.

गुरुवार, ३ सप्टेंबर व शुक्रवार, ४ सप्टेंबर रोजी भगवान श्रीगोपालकृष्ण मूर्ती प्रतिष्ठापना सोहळा पार पडणार असून, शनिवार, ५ सप्टेंबर रोजी गोपाळकाला व उत्सव सांगता होणार आहे.

या सप्ताहात नाशिक भजनी मंडळाची सेवा, बारामती मंडळाचे कृष्ण तांडव, श्रीमद्भगवद्गीता व ज्ञानेश्वरी नित्यपाठ अशा विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

गुरुपौर्णिमा सोहळ्यानंतर विस्तृत कार्यक्रमपत्रिका जाहीर करण्यात येणार असून, या भक्तिमय सोहळ्यात भाविकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# पंडित दीनदयाळ व्याख्यानमालेची नियोजन बैठक संपन्न

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

**ऑक्टोंबर महिन्यात दिग्गज वक्त्यांच्या उपस्थितीत होणार व्याख्यानमालेचे आयोजन**

**तरुणाईच्या जगण्याला वैचारिक बळ देणारी, सु-संस्कारित विचारांचा वारसा पुढे नेण्यासाठी आणि समाजात क्रांतीकारी बदल घडविण्यासाठी व्याख्यानमालेचे आयोजन- वसंत लोढा**

नगर शहरात सांस्कृतिक चळवळ रुजावी, विचार मंथन व्हावे,सामाजिक व राजकीय विषयांवर संवाद घडावा.तसेच तरुणाईच्या जगण्याला वैचारिक बळ देणारी, सु–संस्कारित विचारांचा वारसा पुढे नेण्यासाठी आणि समाजात क्रांतीकारी बदल घडविण्यासाठी,विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींची व चांगल्या सकस समाजाच्या निर्मितीसाठी सकारात्मक विचारांचे आदान प्रदान होण्यासाठी दरवर्षी पंडित दीनदयाळ पतसंस्था व पंडित दीनदयाळ परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने पंडित दीनदयाळ व्याख्यानमालाचे आयोजन करण्यात येते.

पंडीत दीनदयाळ व्याख्यानमालेत 'द केरळ स्टोरी' चित्रपटातील प्रत्यक्ष नायिका श्रीमती औ.श्रुति, उ.प्रदेशचे मा.खा.डॉ.सत्यपाल सिंह(माजी पोलिस महासंचालक, मुंबई,माजी केंद्रीय मंत्री), केरळचे तत्कालीन राज्यपाल मोहम्मद अरीफ खान,तेलुगू चित्रपट अभिनेत्री मा.श्रीमती माधवी लता,दिल्ली येथील ज्येष्ठ पत्रकार तथा प्रखर राष्ट्रभक्त विचारवंत पुष्पेन्द्र कुलश्रेष्ठ, फैज खान,सरकारी वकील उज्वल निकम, मुंबईचे पोलीस महासंचालक विश्वास नांगरे पाटील आदी दिग्गज वक्त्यांनी पंडित दीनदयाळ व्याख्यानमालेत हजेरी लावली आहे.असे प्रतिपादन पंडित दीनदयाळ परिवार प्रतिष्ठान चे संस्थापक व भाजपचे ज्येष्ठ नेते वसंत लोढा यांनी केले आहे.



पं.दीनदयाळ पतसंस्था व दीनदयाळ परिवार,अ. नगर यांच्या संयुक्त विद्यमाने पंडित दीनदयाळ व्याख्यानमालेचे नियोजन बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.याप्रसंगी पंडित दीनदयाळ परिवार प्रतिष्ठान चे संस्थापक व भाजपचे ज्येष्ठ नेते वसंत लोढा,अध्यक्ष धनंजय तागडे, सचिव बाळासाहेब भुजबळ, कार्याध्यक्ष सुरज अग्रवाल, उद्योजक मनिष सोमानी, मिलिंद कोलते,राहुल जामगावकर,किशोर गांधी,महावीर कांकरिया, संग्राम म्हस्के, गोकुळ काळे, शामराव वाघस्कर,कवी दत्तात्रय वारकड, पत्रकार अमोल भांबरकर,निलेश चिपाडे आदी उपस्थित होते.

धनंजय तागडे म्हणाले, व्याख्यानमाले करिता खासदार मनोज तिवारी, खासदार कंगना राणावत, आंतरराष्ट्रीय खेळाडू पी टी उषा,थोर समाजसेविका सुधा मूर्ती,टीव्ही स्टार हास्य कवी आदित्य जैन, सिनेअभिनेते महेश मांजरेकर आणि प्रभाकर सूर्यवंशी या दिग्गज वक्त्यांना संपर्क करण्याचे प्रयत्न चालू आहेत.त्याचप्रमाणे नक्षलवादावर आधारित गडचिरोली कार्यकर्त्यांनी बसवलेले दोन अंकी नाटक प्रबोधनात्मक कार्यक्रम म्हणून या व्याख्यानमाले मध्ये सादर करण्यात येईल.

सुरज अग्रवाल म्हणाले, गेल्या १२ वर्षापासून होणाऱ्या या व्याख्यानमालेला नगरकर रसिक व दर्दी प्रेक्षकांनी भरभरून प्रतिसाद दिला आहे.या व्याख्यानमालेच्या सांस्कृतिक मेजवानी ची नगरकर दरवर्षी आवर्जून वाट पाहत असतात.

सुत्रसंचलन सुरज अग्रवाल यांनी केले.तर आभार बाळासाहेब भुजबळ यांनी मानले.

# नालासोपारा येथे इस्कॉनच्या २६ दिवसीय आध्यात्मिक महोत्सवाची भक्तिमय सांगता!

**नालासोपारा (समर्थ गांवकरी)**

आंतरराष्ट्रीय कृष्णभावनामृत संघाच्या नालासोपारा नामहट्ट केंद्राच्या वतीने २५ व्या गौरववर्षानिमित्त आयोजित २६ दिवसीय आध्यात्मिक महोत्सवाची भक्तिमय वातावरणात भव्य सांगता झाली. या महोत्सवात नालासोपारा व परिसरातील हजारो भाविकांनी सहभाग घेत श्रीकृष्णभक्तीचा अनुभव घेतला. दररोज श्रीमद्भागवत कथा, हरिनाम संकीर्तन, भजन, नृत्य-नाटिका, आध्यात्मिक प्रवचने आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. ९ ऑगस्ट रोजी साकारलेल्या आकर्षक फुल बंगला दर्शनाने भाविकांचे विशेष लक्ष वेधून घेतले. श्रीश्री राधा-कृष्णांच्या पुष्पसजावटीने सजलेल्या मंदिरात दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी झाली.

या प्रसंगी शेठ श्री नानजीभाई खीमजीभाई ठक्कर (ठाणावाला), परमपूज्य ए. सी. भक्तिवेदांत स्वामी प्रभुपाद, श्री मधुमंगलदासजी, श्री राजेंद्र पांडे तसेच साधू-संत उपस्थित होते. नानजीभाई ठक्कर यांनी धार्मिक आणि सेवाभावी उपक्रमांचे कौतुक करताना विविध मंदिरांच्या उभारणीसाठी एन.के.टी. ट्रस्टकडून सहकार्य केले जात असल्याचे सांगितले. जुहू येथे धनलक्ष्मीबेन नानजीभाई ठक्कर अन्नक्षेत्र सुरू केल्यानंतर नालासोपारा येथेही महिनाभर सत्संग, प्रवचन, भजन आणि भोजनसेवेचे आयोजन करण्यात आले. मी अनेक वर्षांपासून नालासोपारा येथे येत आहे. येथे सुरू असलेल्या धार्मिक आणि सेवाभावी उपक्रमांमुळे मला मनापासून आनंद होतो. शिक्षणाशिवाय समाजाचा विकास शक्य नाही. नव्या पिढीला शिक्षण देणे ही समाजाची मोठी जबाबदारी आहे, असे नानजीभाई ठक्कर यांनी सांगितले.

मधुमंगलदासजी यांनी धनलक्ष्मीबेन नानजीभाई ठक्कर व ठक्कर परिवाराकडून नियमितपणे भोजनसेवा दिली जात असल्याचे सांगितले. या महोत्सवादरम्यान सकाळी भागवत कथा, भजन आणि संकीर्तनाचा लाभ भाविकांनी घेतला. फुलांचा आकर्षक रथही साकारण्यात आला होता. यावेळी नानजीभाई ठक्कर यांचा शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. तसेच एन.के.टी. ट्रस्टच्या वतीने परमपूज्य ए. सी. भक्तिवेदांत स्वामी प्रभुपाद यांचाही सन्मान करण्यात आला. आळंदी येथे इंद्रायणी नदीकाठी उभारण्यात आलेल्या २३१ फूट उंच मंदिरासाठी काशीमा खिमजीभाई ठक्कर यांचे सहकार्य लाभल्याचे सांगण्यात आले. पंढरपूर येथील धर्मशाळेसह विविध धार्मिक व सामाजिक उपक्रमांना एन.के.टी. ट्रस्टचे सहकार्य असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले. हरे कृष्ण महामंत्राच्या अखंड संकीर्तनाने महोत्सवाची सांगता झाली.



## थोडक्यात पण महत्त्वाचे

### अगस्ति महाविद्यालयाच्या माध्यमातून ज्ञानगंगा घरोघरी पोहोचली : प्रणालीताई धुमाळ



**(समर्थ गांवकरी) :** अगस्ति कला वाणिज्य व दादासाहेब रुपवते विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयच्या विज्ञान शाखेच्या वतीने नुकतेच पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष सुनीलजी दातीर सेक्रेटरी सुधाकरराव देशमुख विश्वस्त गिरजाजीबुवा जाधव अकोले तालुका एज्युकेशन सोसायटी कार्यकारणी सदस्य सुधाकरराव आरोटे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिवाजीराव खेमनर उपप्राचार्य प्रा.चांगदेव डोंगरे सर परिवेक्षक प्रा.विवेक वाकचौरे सर आदी मान्यवर उपस्थित होते. या पालक मेळाव्यात पालकांच्या वतीने महाविद्यालयाच्या सखी सावित्री व सुरक्षा समितीच्या सदस्या तथा अहिल्यानगर जिल्हा पोलीस पाटील संघटनेच्या महिला अध्यक्षा मा. सौ प्रणालीताई प्रशांत धुमाळ यांनी आपले मनोगत व्यक्त करताना अगस्ति महाविद्यालय हे अकोले तालुक्यातील ग्रामीण भागातील सर्वोत्कृष्ट व गुणवत्तापूर्ण महाविद्यालय असून येथे शिक्षण घेतलेले अनेक विद्यार्थी देश-विदेशात सामाजिक, राजकीय, औद्योगिक, प्रशासकीय, वैद्यकीय, माहिती तंत्रज्ञान व भारतीय सैन्य दलात वरिष्ठ पदावर कार्यरत असून महाविद्यालयाचे नाव लौकिक उंचावण्याचे काम करत आहेत. अकोले तालुक्यातील अगस्ति महाविद्यालयाच्या माध्यमातून अशाप्रकारे ज्ञानगंगा घरोघरी पोहोचवली.

### कोपरगाव शहरातील मोकाट जनावरांचा काही दिवसांत बंदोबस्त करणार : आरोग्य सभापती वैभव आढाव

**कोपरगाव (समर्थ गांवकरी) :** कोपरगाव शहरातील विविध प्रमुख रस्ते, चौक तसेच रहदारीच्या ठिकाणी मोकाट जनावरांचा वावर वाढला असून नागरिकांना त्याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. या प्रश्नाची कोपरगाव नगरपरिषद प्रशासनाने गांभीर्याने दखल घेतली असून काही दिवसांत मोकाट जनावरांचा बंदोबस्त करण्यात येईल, अशी माहिती आरोग्य सभापती वैभव आढाव यांनी दिली.



मोकाट जनावरे पकडण्यासाठी नगरपरिषदेने दोन वेळा निविदा प्रसिद्ध केल्या. मात्र, या कामासाठी कोणत्याही ठेकेदाराने निविदा दाखल केली नाही. त्यामुळे नागरिकांची गैरसोय होऊ नये यासाठी नगरपरिषदेच्या कर्मचाऱ्यांमार्फत मोकाट जनावरे पकडण्याचे काम करण्यात येत आहे. शहरातील काही नागरिकांकडून रस्त्याच्या कडेला चारा टाकला जातो. या चाऱ्याच्या लोभापोटी मोठ्या संख्येने जनावरे मुख्य रस्त्यांवर ठाण मांडून बसतात. त्यामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होण्याबरोबरच अपघाताचा धोका वाढतो. पादचारी, दुचाकीस्वार, वाहनचालक तसेच ज्येष्ठ नागरिकांना याचा त्रास सहन करावा लागतो. असे रस्त्यावर चारा टाकणाऱ्या नागरिकांवर नाईलाजास्तव नगरपरिषदेला कायदेशीर कारवाई करावी लागेल याची नोंद संबंधित नागरिकांनी देखील घ्यावी.

### राज्यस्तरीय गोळाफेक मध्ये सुवर्ण, स्पर्धेत बेस्ट थलीटचा मान,

**तसेच ७ वी शिष्यवृत्ती राज्य गुणवत्ता यादीत युगंधर गणेश वाघमारे २१वा!**



**श्रीगोंदा(समर्थ गांवकरी) :** श्रीगोंदा तालुक्यातील देवदैठण येथील रहिवासी व शिरुर जिल्हा पुणे येथील पोतदार इंटरनॅशनल स्कूलचा विद्यार्थी युगंधर गणेश वाघमारे याने राज्यस्तरीय सी.बी.एस.ई. क्लस्टर मैदानी स्पर्धेत मैदानी गोळाफेक स्पर्धेत सुवर्णपदक मिळवून शिष्यवृत्ती परीक्षेत उत्कृष्ट कामगिरी करत राज्यात एकवीसवा असे दुहेरी दैदिप्यमान यश मिळविल्याने त्याचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. गोळाफेकमध्ये सुवर्ण आणि 'बेस्ट थलीट'चा मान द्रोणा अकॅडमीच्या वतीने दि. ८ ते १० ऑगस्ट दरम्यान जिल्ह्यातील राहता तालुका क्रीडा संकुलात राज्यस्तरीय सी.बी.एस.ई. क्लस्टर मैदानी स्पर्धा पार पडल्या. या स्पर्धेत १४ वर्षांखालील मुलांच्या गटात युगंधर वाघमारे याने गोळाफेक क्रीडाप्रकारात विक्रमी ११.३६ मीटर अंतरावर गोळा फेकून सुवर्णपदक पटकावले. त्याच्या या उत्कृष्ट कामगिरीमुळे त्याला स्पर्धेतील 'बेस्ट थलीट' (सर्वोत्कृष्ट खेळाडू) म्हणून गौरवण्यात आले. या यशामुळे त्याची पंजाब (पटियाला) येथे दि. १५ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या सी.बी.एस.ई.च्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

# शालेय संस्काराची शिदोरी विद्यार्थ्यांना भविष्यात उपयोगी पडते

## ज्ञानवर्धिनीच्या पालकसभेत अमोल वैद्य यांचे स्पष्टीकरण

**अकोले (समर्थ गांवकरी)**



ज्ञानवर्धिनी प्राथमिक शाळा व बालकमंदिर विभागाची पालकसभा संपन्न झाली . पालकांची उपस्थिती उत्साहदर्शक होती.

याच पालकसभेत ऐंशी टक्के शालेय पालकांच्या उपस्थितीत शाळा व्यवस्थापन , सखी सावित्री' विद्यार्थी सुरक्षा व भौतिक सुविधा आणि महिला तक्रार निवारण या चार समित्यांचे अध्यक्ष,उपाध्यक्ष व सदस्यांची निवड करण्यात आली.

सभेच्या अध्यक्षस्थानी ज्ञानवर्धिनी बालकमंदिर विभागाचे चेअरमन अमोल वैद्य यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना विद्यार्थी शिक्षक आणि पालक यांच्या समन्वय व सुसंवादामुळेच शाळेची गुणवत्ता आणि दर्जा वाढत असतो . बालवयात मिळालेले शालेय संस्कार विद्यार्थ्यांचा भाविष्यकाळ आणि सामाजीक जाणीवा निर्माण करत असतात . प्रत्येक पालकांच्या शंका समस्या आणि गुणवत्ता व भौतिक सुविधासाठी प्रामाणीक प्रयत्न करू असे आश्वासन दिले . तसेच

ज्ञानवर्धिनी शाळेसाठी धर्माधिकारी रंगमंच व पेवर ब्लॉक स्वखर्चातून उभारणी करून देणारे अनुकमे श्री व सौ . सुरेखा मोरेश्वर धर्माधिकारी व सुधाताई देशपांडे यांच्याबद्दल कृतज्ञता व आभार व्यक्त केले.

या प्रसंगी पालक व शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्ष डॉ . नीरजा कुलकर्णी ,पूजा मोरे, भारती जोशी , नवनाथ पांडे, निखिल जगताप, हिरा बिडवे, अधिराज वैद्य या पालकांनी क्षेत्रभेटीतून श्रमांचा आदर आणि स्व कौशल्य विकास ,विद्यार्थ्यांचा अभ्यास , प्रतिकूल परिस्थितीत संघर्ष करणारे विद्यार्थी, भौतिक सुविधा ,संगणक शिक्षण डिजीटल क्लासरूम याबाबत आपल्या मार्गदर्शक सूचना मांडल्या. त्यावर सर्वांनुमते निर्णय घेण्यात आले.

या पालकसभेत माजी प्राचार्य संतोष कचरे , एकल महिला समितीच्या समन्वयक प्रतिभा कुलकर्णी संस्थेचे कार्यकारिणी सदस्य दिलीपभाई शहा यांनी मनोगत व्यक्त केले . याप्रसंगी मॉडर्न ज्यू कॉलेज विभागाचे चेअरमन बाळासाहेब वडजे, स्थानिक समिती सदस्य पत्रकार अल्ताफ शेख, ज्येष्ठ संचालिका पुष्पाताई वाणी यांची उपस्थिती लाभली.

शाळेचे मुख्याध्यापक रावसाहेब नवले यांनी पालकमेळाव्याचे विषय पालकांसमोर विशद केले. सुत्रसंचलन शालेय शिक्षक बाळासाहेब मांडे यांनी केले. महाराष्ट्र गीतानंतर आभार दत्तू पोपेरे यांनी मानले. पालकसभा यशस्वी होण्यासाठी सर्व शालेय शिक्षकांनी परिश्रम घेतले.

# राज्य पत्रकार संघटनेच्या जिल्हा सरचिटणीसपदी जनार्दन जगताप; कोपरगाव तालुकाध्यक्षपदी विजय कापसे

**पत्रकारांच्या न्याय हक्कासाठी दोन्ही पदाधिकाऱ्यांची निवड; विविध क्षेत्रांतून अभिनंदनाचा वर्षाव**

**कोपरगाव (समर्थ गांवकरी)**



जनार्दन जगताप



विजय कापसे

पत्रकारांच्या न्याय हक्कासाठी अहोरात्र कार्यरत असलेल्या राज्य पत्रकार संघ मुंबई या राज्यातील अग्रगण्य पत्रकार संघटनेच्या अहिल्यानगर जिल्हा सरचिटणीसपदी ज्येष्ठ पत्रकार जनार्दन जगताप, तर कोपरगाव तालुकाध्यक्षपदी पत्रकार प्रा. विजय कापसे यांची निवड करण्यात आली आहे. संघटनेचे प्रदेशाध्यक्ष निलेश सोमानी, राज्य संघटक संजय भोकरे, जिल्हाध्यक्ष अनिल कोळसे व जिल्हा निवड समिती अध्यक्ष सोमनाथ काळे यांच्या सूचनेनुसार निवड करण्यात आली असल्याची माहिती संघटनेचे प्रदेश सरचिटणीस डॉ विश्वासराव आरोटे यांनी दिली आहे.

जनार्दन जगताप हे गेल्या ३० वर्षांपासून पत्रकारिता क्षेत्रात कार्यरत असून, आपल्या लेखणीच्या माध्यमातून सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या प्रशासनाच्या निदर्शनास आणून देत त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील आहेत. ते सध्या दैनिक सार्वमत व दैनिक वीरभूमीचे कोपरगाव प्रतिनिधी म्हणून कार्यरत आहेत. पत्रकार संघटनेतही त्यांनी विविध पदांवर जबाबदारी सांभाळली आहे. मागील २ वर्षे त्यांनी तालुकाध्यक्ष म्हणून प्रभावीपणे काम करताना अनेक सामाजिक व शैक्षणिक उपक्रम राबविले. विशेषतः महिला दिनानिमित्त कोपरगाव तालुक्यातील सर्व अंगणवाडी सेविकांचा सन्मान करून त्यांनी राज्यभरात वेगळा आदर्श निर्माण केला होता. त्यांच्या कार्याची दखल घेत त्यांच्यावर आता जिल्हा सरचिटणीसपदाची महत्त्वाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

तर प्रा. विजय कापसे हे गेल्या ९ वर्षांपासून पत्रकारिता क्षेत्रात कार्यरत असून, आपल्या निर्भीड लेखणीच्या माध्यमातून अनेक उपेक्षित प्रश्नांना व विकासकामांना सातत्याने वाचा फोडत आहेत. ते पेशाने शिक्षक असून सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातही त्यांचे उल्लेखनीय योगदान आहे. ते दैनिक लोकमंथन या वृत्तपत्राचे कोपरगाव प्रतिनिधी म्हणून कार्यरत आहेत.

प्रा. कापसे यांनी यापूर्वी संघटनेत सहसचिव, कार्याध्यक्ष अशा विविध पदांवर काम केले आहे. मागील २ वर्षांपासून त्यांनी सचिव म्हणून संघटनेचे काम प्रभावीपणे पुढे नेले.

# गोदावरी तीरावर महिला भाविकांसाठी चेंजिंग रूम उभारावी,संजीवनी युवा प्रतिष्ठानची नगराध्यक्ष पराग संधान यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी

**कोपरगाव (समर्थ गांवकरी)**



पवित्र श्रावण महिन्यात गोदावरी नदीवर स्नानासाठी येणाऱ्या हजारो महिला भाविकांची होणारी गैरसोय लक्षात घेऊन कोपरगाव शहरातील गोदावरी तीराच्या दोन्ही बाजूंना महिलांसाठी स्वतंत्र चेंजिंग रूम उभारण्यात याव्यात, अशी मागणी संजीवनी युवा प्रतिष्ठानच्या युवा सेवकांनी नगराध्यक्ष पराग संधान यांच्याकडे निवेदनाद्वारे केली.

निवेदनात म्हटले आहे की,पवित्र श्रावण महिन्यात कोपरगाव तालुक्यासह परिसरातील विविध गावांमधून मोठ्या संख्येने भाविक गोदावरी नदीत पवित्र स्नानासाठी येतात. गोदावरी नदीवरील स्व. सूर्यभान वहाडने पाटील घाट परिसरात प्रत्येक श्रावणी सोमवारी भाविकांची मोठी गर्दी होत असते. याच ठिकाणी संजीवनी युवा प्रतिष्ठानच्या वतीने दरवर्षी भव्य गंगाआरतीचे आयोजन करण्यात येत असल्याने भाविकांचा मोठा ओघ असतो.

मात्र, स्नानानंतर कपडे बदलण्यासाठी महिलांसाठी कोणतीही स्वतंत्र व्यवस्था उपलब्ध नसल्याने माता-भगिनींना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागतो.त्यामुळे गोदावरी तीराच्या दोन्ही बाजूंना महिलांसाठी कायमस्वरूपी चेंजिंग रूम उभारण्यात याव्यात, अशी प्रमुख मागणी निवेदनातून करण्यात आली. याशिवाय, गोदावरीवरील लहान पुलावरील कठडे व बॅरेकेटिंगची तातडीने दुरुस्ती करून भाविकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना कराव्यात. श्रावणी सोमवारी होणाऱ्या गंगाआरतीच्या पार्श्वभूमीवर नगरपरिषदेच्या वतीने स्वच्छता, प्रकाश व्यवस्था, पिण्याच्या पाण्याची सुविधा, कचरा व्यवस्थापन तसेच इतर मूलभूत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशीही मागणी करण्यात आली. तसेच नाशिक येथे होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर कोपरगाव येथे गोदावरी तीरावर कायमस्वरूपी स्नानगृहे व महिलांसाठी चेंजिंग रूमची सुविधा उभारण्यात यावी, अशीही विनंती निवेदनातून करण्यात आली. नगराध्यक्ष पराग संधान यांनी निवेदन स्वीकारून मागण्यांबाबत सकारात्मक भूमिका घेत संबंधित विभागामार्फत आवश्यक कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले.यावेळी संजीवनी युवा प्रतिष्ठानचे सर्व युवा सेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संजीवनी युवा प्रतिष्ठानचे संस्थापक आमदार विवेकभैय्या कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रतिष्ठानच्या माध्यमातून विविध सामाजिक, धार्मिक व जनहिताचे उपक्रम सातत्याने राबविले जात आहेत. महिला भाविकांना मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी करण्यात आलेली ही मागणीही त्याच सामाजिक बांधिलकीचा एक भाग असल्याचे यावेळी प्रतिष्ठानच्या युवा सेवकांनी सांगितले.

# वीरशैव माहेश्वर मंडळाचा १५ वा स्थापना दिवस उत्साहात; गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव!

**ठाणे (समर्थ गांवकरी) :** वीरशैव माहेश्वर मंडळ, ठाणे यांच्या वतीने १५ वा स्थापना दिवस, गुरुपौर्णिमा महोत्सव तसेच विद्यार्थी गुणगौरव सोहळा मोठ्या उत्साहात व आध्यात्मिक वातावरणात पार पडला. कार्यक्रमाची सुरुवात रुद्राभिषेकाने झाली. श्रीक्षेत्र धारेश्वर, वाळवा, वाई आणि रायपाटण येथील श्रीगुरूंच्या पावन सान्निध्यात गुरुपाद्यपूजन विधी संपन्न झाला. यावेळी शेठ डॉ. नानजीभाई खीमजीभाई ठक्कर (ठाणावाला) तसेच कर्नाटकातून आलेले संत उपस्थित होते. याप्रसंगी 'दीक्षा विधी मुहूर्त संहिता' या ग्रंथाचे प्रकाशन करण्यात आले.

इयत्ता दहावी, बारावी, पदवी तसेच विविध सामाजिक क्षेत्रांत उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा व गुणवंत व्यक्तींचा सन्मानपत्र व स्मृतिचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. प्रमुख अतिथी शेठ डॉ. नानजीभाई ठक्कर यांनी विद्यार्थ्यांना ज्ञान, संस्कार, शिस्त, मेहनत आणि समाजसेवेच्या भावनेने पुढे जाण्याचे आवाहन केले. गुरुपौर्णिमा केवळ एका दिवसापुरती मर्यादित न ठेवता वर्षातील ३६५ दिवस गुरुपौर्णिमेची भावना मनात ठेवावी. आई-वडील आणि ज्येष्ठांचा सन्मान दररोज केला पाहिजे. तुमचे यश हे केवळ कुटुंबाचे नव्हे, तर संपूर्ण समाजाचे यश आहे, असे त्यांनी सांगितले.

वीरशैव माहेश्वर मंडळ गेल्या १५ वर्षांपासून धार्मिक, शैक्षणिक व सामाजिक उपक्रम राबवत असल्याचे यावेळी सांगण्यात आले. विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी गुणगौरव सोहळ्याचे आयोजन केले जाते.

# पांडुरंग महोत्सवानिमित्त मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर उत्साहात संपन्न

**राहुरी (समर्थ गांवकरी)**

श्री पांडुरंग महोत्सव व गोपाळकाला उत्सवानिमित्त ताहाराबाद येथील श्री संत कवी महिपती महाराज देवस्थान येथे मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले. एच. व्ही. देसाई नेत्र रुग्णालय, हडपसर, पुणे संचलित नेत्र तपासणी केंद्र, राहुरी, दिव्यांग शक्ती सेवा संस्था, राहुरी आणि प्रहार दिव्यांग संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने हे शिबिर घेण्यात आले.

या शिबिराचे उद्घाटन महंत ह. भ. प. अर्जुनजी महाराज तनपुरे (मठाधिपती, श्री संत कवी महिपती महाराज देवस्थान, ताहाराबाद) तसेच पोलीस निरीक्षक रवींद्र देशमुख यांच्या शुभहस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री संत कवी महिपती महाराज देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष राजेंद्र साबळे होते.

पांडुरंग महोत्सवानिमित्त देवदर्शनासाठी आलेल्या हजारो भाविकांची मोफत नेत्र तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान मोतीबिंदू आढळलेल्या रुग्णांची पुढील मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी निवड करण्यात आली.

या शिबिराचे वैशिष्ट्य म्हणजे निवड झालेल्या रुग्णांची मोतीबिंदू शस्त्रक्रिया लेन्ससहित पूर्णपणे मोफत एच. व्ही. देसाई नेत्र रुग्णालय, हडपसर, पुणे येथे करण्यात येणार आहे. यासाठी रुग्णांनी आवश्यक कागदपत्रे म्हणून आधार कार्ड, रेशन कार्ड व पासपोर्ट साईज फोटो जमा करणे आवश्यक असल्याची माहिती देण्यात आली.

यावेळी प्रहार दिव्यांग संघटनेचे जिल्हाध्यक्ष मधुकर घाडगे यांनी प्रास्ताविकातून, रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा मानून दिव्यांगांसह ज्येष्ठ नागरिकांची सेवा करणे ही आपली सामाजिक जबाबदारी आहे, असे सांगितले.

एच. व्ही. देसाई नेत्र रुग्णालयाचे प्रतिनिधी डॉ. संकेत घोलप यांनी उपस्थितांना डोळ्यांची काळजी कशी घ्यावी, नेत्रविकार टाळण्यासाठी कोणती खबरदारी घ्यावी तसेच रुग्णालयामार्फत उपलब्ध असलेल्या विविध सेवांची सविस्तर माहिती दिली. मोतीबिंदू शस्त्रक्रियेसोबतच आवश्यक लेन्सही शंभर टक्के मोफत उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. ज्येष्ठ नागरिकांचा आशीर्वाद आणि सहकार्य हीच आमच्यासाठी प्रेरणा आहे, असेही त्यांनी नमूद केले.

यावेळी प्रहार दिव्यांग संघटनेचे जिल्हा सल्लागार सलीमभाई शेख,



जिल्हा समन्वयक आप्पासाहेब ढोकणे, रुग्णसेवक गौरव तनपुरे, संस्थेचे सचिव बाळासाहेब मुसमाडे यांच्यासह श्री पांडुरंग महोत्सव यात्रा कमिटीचे सदस्य व प्रहार दिव्यांग संघटनेचे विविध पदाधिकारी उपस्थित होते.

शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी प्रहार संघटनेचे शाखाध्यक्ष कैलास हारदे, तालुकाध्यक्ष योगेश लबडे, तालुका सचिव रवींद्र भुजाडी, तालुका उपाध्यक्ष विजय म्हसे, तालुका खजिनदार नानासाहेब खपके, सिद्धार्थ नेहे, बाळासाहेब गांडाळ, पाराजी भोसले तसेच प्रहार सैनिक व पदाधिकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जिल्हा समन्वयक आप्पासाहेब ढोकणे यांनी केले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे - ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : अ-१, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# थोडक्यात पण महत्त्वाचे

## विद्यार्थ्यांचा अभियंता घडविण्याचा प्रवास सुरू : राजेंद्र कटारिया

### डॉ.पाऊलबुधे तंत्रनिकेतनच्या प्रथम वर्ष विद्यार्थ्यांचे स्वागत



**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी) :** आजचे युग हे विज्ञान आणि तंत्रज्ञानाचे युग आहे या योगाचे नेतृत्व करण्याची क्षमता विद्यार्थ्यांमध्ये कशी निर्माण करता येईल हे करण्याचे काम महाविद्यालय करीत आहे पुस्तकी ज्ञानाबरोबरच प्रात्यक्षिक ज्ञान कौशल्य विकास व्यक्तिगत विकास या महाविद्यालयात होतो तुमच्यातील अभियंता घडविण्याचा प्रवास आज पासून सुरू झाला आहे.असे प्रतिपादन एमआयडीसी येथील आमिचे अध्यक्ष राजेंद्र कटारिया यांनी केले.

नारायण डोह येथील डॉ.पाऊलबुधे तंत्रनिकेतन महाविद्यालयातील प्रथम वर्षातील नवीन प्रवेश घेण्यात आलेल्या विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला.यावेळी प्रमुख पाहुणे राजेंद्र कटारिया, संस्थेचे उपाध्यक्ष रामभाऊ बुचकूल सचिव रामकिसन देशमुख, खजिनदार दादासाहेब भोईटे, आयुर्वेद कॉलेजचे प्राचार्य बाळासाहेब पागिरे तंत्रनिकेतनचे प्राचार्य बाळासाहेब बोर्डे आदि उपस्थित होते.

श्री.कटारिया पुढे म्हणाले हे महाविद्यालय म्हणजे आकाश आहे ते तुमच्या स्वप्नांना पंख देतील, तुम्ही आकाशात उंच भरारी घेण्यासाठी सज्ज व्हा, येथे उज्वल भविष्य तुमचे घडणार आहे. चांगला अभ्यास करा, त्याबरोबरच विविध स्पर्धा कार्यक्रमांमधून तुमची कला, कौशल्य, गुण दाखवा. असे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले. यावेळी नवीन प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांना नोटबुक, पेन, पेन्सिल व इतर शालेय साहित्य वस्तूंचे वितरण भेट म्हणून करण्यात आले.

## गुरुवार पासून माथणी गावात ज्ञानेश्वरी पारायणास प्रारंभ

**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी) :** नगर तालुक्यातील माथणी गावात श्री हनुमान सेवा निमित्त गुरुवार दि. १३ ऑगस्ट २०२६ रोजी ज्ञानेश्वरी पारायणास प्रारंभ होत आहे. त्या निमित्ताने अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन समस्त माथणी गावकऱ्यांनी केले आहे. यावेळी विणा पूजन व व्यासपीठ श्रीक्षेत्र बाळनाथ गडाचे हभप धर्मनाथ महाराज मालुसरे करणार आहेत.अशी माहिती महाराष्ट्र वारकरी सांप्रदाय सेवा संघटनेचे उपाध्यक्ष हभप माऊली गायकवाड यांनी दिली.



या अखंड हरिनाम सप्ताह सोहळ्यास विधान परिषदेचे सभापती ना.राम शिंदे पालकमंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील खा.निलेश लंके, माजी खा.डॉ.सुजय विखे पाटील आ. विक्रम पाचपुते, आ.अक्षय कर्डिले, प्रा.शशिकांत गाडे तसेच मान्यवर व्यक्ती उपस्थित राहणार आहेत.

या सप्ताहात पहाटे काकडा, सकाळी विष्णू सहस्त्रनाम, गाथा भजन, प्रवचन, हरिपाठ, हरिकीर्तन, हरी जागर तसेच ज्ञानेश्वरी पारायण रोज सकाळी ७ ते ९ व दुपारी २ ते ४ या वेळेत होणार आहे.

या सप्ताह मध्ये रोज रात्री ७ ते ९ हरिकीर्तनाचा कार्यक्रम होणार असून कीर्तन सेवा हभप मच्छिंद्र डरंगे, लक्ष्मण महाराज नांगरे, वसंत महाराज वसंतगडकर, हभप झेंडे महाराज, ज्ञानेश्वर महाराज कराळे, नंदकिशोर महाराज देवकर,हभप विकासानंद मिसाळ हे देणार आहेत. तरी भाविकांनी ज्ञानेश्वरी पारायण व कीर्तनाच्या श्रवणाचा लाभ घ्यावा.असे आवाहन माथणी ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

या सप्ताहाची सांगता गुरुवार दि. २० ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी १० ते १२ हभप मंगेश महाराज मोरे (देहू)यांचे काल्याचे किर्तन व महाप्रसादाने होईल. तरी पंचक्रोशीतील भक्तगणांनी उपस्थित रहावे.असे माऊली गायकवाड यांनी सांगितले.

## दिल्लीगेटला दि. १५ व १६ ऑगस्टला व्यवसाय, उद्योजकासाठी प्रदर्शन



**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी) :**येथील प्रतिबिब च्या वतीने उद्योजकता वाढविण्यासाठी व छोटे व्यावसायिक, उद्योजकाच्या सक्षमीकरणासाठी प्रदर्शन आयोजित केले असून ज्यात छोट्या व्यावसायिकांना तसेच मध्यम व्यवसायिकांना एक व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात येत आहे.

दि. १५ व १६ ऑगस्ट २०२६ रोजी २ दिवसीय प्रदर्शन शमी गणपती हॉल, दिल्लीगेट, अहिल्यानगर येथे सकाळी १० ते रात्री ९ यावेळेत सर्वासाठी खुले असणार आहे,यामध्ये विविध प्रकारचे सुमारे २० स्टोलचे नियोजन आहे.सर्व व्यावसायिक,गृह उद्योजक या प्रदर्शनातील स्टॉलमध्ये सहभागी होऊ शकतात.

# नाशिक फाटा ते राजगुरुनगर एलिव्हेटेड कॉरिडॉरची निविदा येत्या पंधरा दिवसांत

**नारायणगाव (समर्थ गांवकरी)**

नाशिक फाटा ते राजगुरुनगर एलिव्हेटेड कॉरिडॉरची निविदा येत्या पंधरा दिवसांत मार्गी लागणार असून त्यानंतर लागलीच हे काम सुरू होणार आहे. केंद्रीय रस्ते वाहतूक व राजमार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी अधिकाऱ्यांना यासंबंधी तातडीने लक्ष घालून निविदा प्रक्रिया राबविण्याच्या सूचना केल्या आहेत, अशी माहिती खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी दिली.

खासदार डॉ.कोल्हे यांनी आज नवी दिल्ली येथे गडकरी यांची भेट घेऊन शिरूर लोकसभा मतदारसंघातील रस्ते आणि दळणवळणाशी संबंधित विविध प्रश्नांवर त्यांच्याशी चर्चा केली. यावेळी नाशिक फाटा ते राजगुरुनगर या उन्नत मार्गाच्या कामाला गती देण्याची आपण विनंती केल्याचे डॉ. कोल्हे यांनी सांगितले.

या उन्नत रस्त्याच्या कामासाठी १०० टक्के जमीन अधिग्रहण झाल्याशिवाय प्रकल्प सुरू करता येणार नाही, या कॅबिनेटच्या निर्णयामुळे प्रकल्पाला विलंब होत असल्याचे या चर्चेतून समोर आले. त्यावर आवश्यक असलेल्या १० हेक्टर जमिनीपैकी पीएमआरडीए क्षेत्रातील ६.९१ हेक्टर जमिनीच्या भूसंपादनासाठी निधी उपलब्ध झाला असून पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील ३.८१ हेक्टर जमिनीच्या भूसंपादनासाठी पुढील १५ दिवसात निधी उपलब्ध होणार असल्याचे गडकरी यांनी या भेटीत सांगितले. त्याचबरोबर गडकरी यांनी स्वतः पुणे जिल्हाधिकाऱ्यांशी संपर्क साधून या प्रकल्पाची सद्यस्थिती जाणून घेत भूसंपादन प्रक्रियेला गती देण्याचे निर्देश दिले, असे डॉ. कोल्हे यांनी सांगितले.

मंचर आणि कळंब बायपास जवळ भुयारी मार्ग आणि सेवा रस्त्याची मागणी

मंचर आणि कळंब बायपास येथील अपघातप्रवण जागेवर लवकरात लवकर भुयारी मार्ग आणि सेवा रोड करण्यात यावा, अशी मागणीही डॉ. कोल्हे यांनी नितीन गडकरी यांच्याकडे केली. त्याबरोबरच एमएसआयडीसीकडे हस्तांतरित करण्यात आलेल्या तळेगाव – चाकण – शिक्रापूर, हडपसर – यवत आणि पुणे–शिरूर या महामार्गांवर मोठ्या प्रमाणात खड्ड्यांचे साम्राज्य तयार झाले आहे. या मार्गांवरून प्रवास करणाऱ्या नागरिकांना यामुळे मोठ्या मनस्ताप व आरोग्याच्या समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. या खड्ड्यांमुळे गंभीर अपघात होत असून या



अपघातात अनेक नागरिकांना जीव गमवावा लागला आहे, ही बाबही डॉ. अमोल कोल्हे यांनी गडकरी यांच्या निदर्शनास आणून दिली. त्यावर गडकरी यांनी तातडीने एमएसआयडीसीचे व्यवस्थापकीय संचालक ब्रजेश दीक्षित यांना रस्ते दुरुस्तीच्या कामांना प्राधान्य देण्याच्या सूचना दिल्या.

# शहापूर तहसील कार्यालयावर सिटू-किसान सभेचा 'जेल भरो' मोर्चा!



**शहापूर (समर्थ गांवकरी)**

शेतकरी, शेतमजूर आणि कामगारांच्या विविध मागण्यांसाठी भारतीय ट्रेड युनियन केंद्र (सिटू) आणि अखिल भारतीय किसान सभेच्या वतीने आज शहापूर तहसील कार्यालयासमोर 'जेल भरो' आंदोलन करण्यात आले. केंद्र व राज्य सरकारच्या धोरणांविरोधात जोरदार घोषणाबाजी करीत आंदोलकांनी तहसील कार्यालयावर धडक देत सरकारचे लक्ष वेधले.

अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना तातडीने नुकसानभरपाई द्यावी, पीककर्ज माफ करून नव्याने कर्ज उपलब्ध करून द्यावे, वनजमिनी व इतर जमिनींच्या हक्कांचा प्रश्न मार्गी लावावा, स्मार्ट मीटरची सक्ती रद्द करून वाढीव वीजबिलांचा प्रश्न सोडवावा, तसेच जलजीवन मिशनची रखडलेली कामे पूर्ण करावीत, अशा मागण्या आंदोलकांनी केल्या. धरणातील पाणी सर्वसामान्य नागरिकांसह शेतीसाठी उपलब्ध करून द्यावे, केंद्र सरकारने लागू केलेल्या चार कामगार संहिता रद्द कराव्यात, मनरेगामध्ये वर्षभर रोजगाराची हमी देऊन किमान ७०० रुपये रोजंदारी द्यावी, अशीही मागणी करण्यात आली.

जिल्हा परिषदेच्या शाळा बंद करण्याचे धोरण थांबवून रिक्त शिक्षकांची पदे तातडीने भरावीत, गोरगरीब कुटुंबांना घरकुलाचा लाभ मिळावा आणि रेशन व्यवस्थेतील भ्रष्टाचाराला आळा घालावा, यासाठीही आंदोलकांनी आवाज उठविला. शेतकरी, शेतमजूर आणि कामगारांच्या प्रश्नांकडे सरकारने यापुढेही दुर्लक्ष केल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशारा सिटू आणि किसान सभेच्या पदाधिकाऱ्यांनी यावेळी दिला.

# चार पुलांसाठी १२ कोटी ३४ लाखांचा निधी मंजूर

### खासदार नीलेश लंके यांच्या पाठपुराव्याला यश

**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)**



प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत अहिल्यानगर जिल्ह्यातील ग्रामीण भागातील चार महत्त्वपूर्ण पुलांच्या बांधकामांसाठी एकूण १२ कोटी ३४ लाख ८६ हजार रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. खासदार नीलेश लंके यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे ही कामे मंजूर झाली असून, नगर व पारनेर तालुक्यातील नागरिकांच्या दळणवळणाचा प्रश्न सुटण्यास मोठी मदत होणार आहे.

नगर तालुक्यातील मठ पिंपरी ते डोबळेवस्ती म र्गावरील ९० मीटर लांबीच्या पुलासाठी ४ कोटी ६६ लाख ५३ हजार रुपये मंजूर करण्यात आले आहेत. हा पूल पूर्ण झाल्यानंतर परिसरातील नागरिकांना वर्षभर सुरक्षित व सुरळीत वाहतूक सुविधा उपलब्ध होणार आहे.

पारनेर तालुक्यातील डिकसळ ते जामगाव मार्गावरील पुलाच्या बांधकामासाठी २ कोटी ६६ लाख ४२ हजार रुपये मंजूर झाले आहेत. तसेच गरखिंडी ते आळकुटी मार्गावरील दोन पुलांच्या कामांसाठी अनुक्रमे २ कोटी ८४ लाख ७५ हजार आणि २ कोटी १७ लाख १६ हजार रुपये निधी मंजूर झाला आहे. ग्रामीण भागातील ओढे, नाले व पाण्याच्या प्रवाहामुळे विशेषतः पावसाळ्यात वाहतुकीला अडथळे निर्माण होतात. अनेकदा नागरिकांना पर्यायी मार्गांचा वापर करावा लागतो. पुलांची कामे पूर्ण झाल्यानंतर ही समस्या मोठ्या प्रमाणात कमी होण्याची अपेक्षा आहे.

या पुलांचा सर्वाधिक फायदा शेतकरी, विद्यार्थी, महिला, रुग्ण तसेच दैनंदिन कामासाठी प्रवास करणाऱ्या नागरिकांना होणार आहे. शेतमालाची वाहतूक अधिक सुलभ होऊन बाजारपेठेशी संपर्क वाढणार आहे. शिक्षण, आरोग्य आणि रोजगाराच्या सुविधांपर्यंत पोहोचणेही सोपे होणार आहे.

ग्रामीण भागातील पायाभूत सुविधा मजबूत करण्याच्या दृष्टीने ही कामे महत्त्वाची मानली जात आहेत. पुलांमुळे गावागावांतील संपर्क वाढण्याबरोबरच स्थानिक आर्थिक व्यवहारांनाही चालना मिळणार आहे.

निधी मंजूर झाल्यानंतर संबंधित विभागाने प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करून प्रत्यक्ष कामांना लवकर सुरुवात करावी. पुलांची कामे निर्धारित कालावधीत आणि दर्जेदार पद्धतीने पूर्ण करून नागरिकांना त्याचा लाभ मिळवून द्यावा, अशी अपेक्षा संबंधित गावांतील नागरिकांकडून व्यक्त होत आहे. या चार पुलांच्या मंजुरीमुळे अहिल्यानगर जिल्ह्यातील ग्रामीण दळणवळण अधिक सक्षम होऊन विकासकामांना गती मिळणार असल्याचे खासदार निलेश लंके यांच्या वतीने सांगण्यात आले.

**मंजूर कामे व निधी**

- मठ पिंपरी–डोबळेवस्ती, ता. नगर : ९० मीटर पूल : ४ कोटी ६६ लाख ५३ हजार,
- डिकसळ–जामगाव, ता. पारनेर : पूल : २ कोटी ६६ लाख ४२ हजार,
- गरखिंडी–अळकुटी, ता. पारनेर : पूल : २ कोटी ८४ लाख ७५ हजार,
- गरखिंडी–आळकुटी, ता. पारनेर : आणखी एक पूल : २ कोटी १७ लाख १६ हजार

एकूण मंजूर निधी : १२ कोटी ३४ लाख ८६ हजार

# जि. प.प्राथमीक शाळा नांदुरी दुमाला शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा

### इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांची जिल्हा गुणवत्ता यादीत निवड

**संगमनेर (समर्थ गांवकरी)**

संगमनेर तालुक्यातील नांदुरी दुमाला येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा येथे एप्रिल २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या पूर्व प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नांदुरी दुमाला येथील इयत्ता चौथीचा विद्यार्थी कुमार प्रणव अंकुश कराळे याने जिल्हा गुणवत्ता यादीत स्थान पटकावले .त्यानिमित्त १२ ऑगस्ट २०२६ रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नांदुरी दुमाला व शाळा व्यवस्थापन समिती यांच्या वतीने इयत्ता चौथीच्या शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला. शाळेचा शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल ७६ टक्के लागला असून पात्र विद्यार्थ्यांपैकी प्रथम क्रमांक प्रणव अंकुश कराळे– २३४ गुण जिल्हा गुणवत्ता यादीत स्थान मिळवले. आराध्या लहान भाऊ नेहे –२१६ गुण, तृतीय ओम अमोल कराळे –२१२ गुण, चौथी सानवी महेश शेळके –१९४ गुण, पाचवा आर्यन सोमनाथ नेहे– १९२ गुण. या पहिल्या पाच विद्यार्थ्यांबरोबरच उर्वरित सर्व पात्र विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला .तसेच कुमारी आरोही राहुल कवडे या विद्यार्थिनीने इ.३ री मंथन शिष्यवृत्ती परीक्षेत २२८ गुण मिळवून केंद्रस्तरावर आठवा क्रमांक पटकावला. तसेच प्रणव अंकुश कराळे यानेही इ.४थी मंथन शिष्यवृत्ती परीक्षेत २५८ गुण मिळवून केंद्रात दुसरा क्रमांक पटकावला. त्याबद्दल दोघांचाही विशेष ट्रॉफी देऊन याप्रसंगी सत्कार करण्यात आला. शाळेची माजी विद्यार्थीनी कुमारी वैष्णवी मीनानाथ शेळके नवोदय परीक्षेमध्ये गुणवत्ता यादीत आली.तिची



नवोदय विद्यालयासाठी निवड झाली. त्याबद्दल तिचा सत्कार करण्यात आला .या सत्कार समारंभा प्रसंगी शिक्षण विभागाच्या विस्तार अधिकारी श्रीमती नंदा वलवे, आणि केंद्रप्रमुख संतोष घुले यांनी मनोगत व्यक्त केले. मुख्याध्यापिका श्रीमती उर्मिला कानवडे यांनी शालेय प्रगतीचा आढावा सांगितला .याप्रसंगी चौथीच्या वर्गशिक्षिका श्रीमती ज्योती बिटला यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाप्रसंगी नांदुरी दुमाला गावाचे विद्यमान सरपंच निखिल निळे, संगमनेर कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक मारुती कवडे, एड. मीनानाथ शेळके, सोन्याबापू नेहे, कैलास कवडे , अर्चना शेळके, शांताराम कवडे तसेच मुख्याध्यापक भाऊसाहेब कोटकर , अमोल कवडे उपाध्यक्ष शाळा व्यवस्थापन समितीचे मनोज उपरे , दिलीप कवडे ग्रामपंचायत सदस्य इ सर्व मंडळी उपस्थित होते .कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष राहुल कवडे, सदस्य दिपाली कवडे, अमोल कराळे, योगेश साबळे ,श्री श्रीकृष्ण शेटे, श्री नवनाथ कवडे, दत्तात्रय कोठवळ, सौ छाया कवडे , अंकुश कराळे, सोमनाथ नेहे, पंकज शेळके ,शिक्षक संजय शिंदे , नरेंद्र दुस्सा आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळा व्यवस्थापन समिती सदस्य गोरक्ष कवडे आणि शिक्षिका श्रीमती ज्योती बिटला यांनी केले.

# श्री मोहटादेवी मंदिरात भक्ती भावाने आणि पारंपारिक पद्धतीने दीपपूजन सोहळा

**पाथर्डी (समर्थ गांवकरी)**

श्रीक्षेत्र मोहटादेवी गड येथे आषाढ अमावस्याचे औचित्य साधून मंदिराच्या मुख्य गाभाऱ्यात अत्यंत भक्तिभावाने आणि पारंपारिक पद्धतीने दीपपूजन सोहळा संपन्न झाला. 'तमसो मा ज्योतिर्गमय' म्हणजेच अंधाराकडून प्रकाशाकडे जाणे, हा या सणाचा मुख्य संदेश आहे. पवित्र श्रावण महिन्याच्या स्वागतासाठी आणि जगदंबा माता मोहटादेवीच्या चरणी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी या विशेष पूजेचे आयोजन करण्यात आले होते. श्री मोहटादेवीची विधीवत महापूजा देवस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुरेश भणगे यांचे हस्ते करण्यात आली.

मंदिराच्या मुख्य गाभाऱ्यात पारंपरिक समया, चांदीचे व पितळी निरांजन प्रज्वलित करण्यात आल्या होत्या. दिव्यांच्या लख्ख आणि मनमोहक प्रकाशाने संपूर्ण मंदिर गाभारा उजळून निघाला होता. कार्यक्रमाचे पौरोहित्य भुषणदेवा साकरे, भास्कर देशपांडे, विकास क्षीरसागर यांनी केले. यावेळी जनसंपर्क अधिकारी भिमराव खाडे, लेखापाल संदीप घुले तसेच कर्मचारी व भाविक भक्त मोठ्या



संख्येने उपस्थित होते. दीप अमावस्या असल्यामुळे दर्शनासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. दिव्यांच्या या दिव्य प्रकाशामुळे संपूर्ण गडावर एक वेगळीच सकारात्मक ऊर्जा आणि चैतन्य निर्माण झाले होते, अशी भावना उपस्थित भाविकांनी व्यक्त केली. श्री मोहटादेवी गडावर येणाऱ्या घाटरस्त्याचे कामे पूर्ण झालेले असून मंदिर परिसरातील डोंगर आणि आजूबाजूचा परिसर हिरव्यागार वनश्रीने नटला आहे. निसर्गरम्य वातावरणामुळे दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांसाठी श्री मोहटादेवी मंदिर आकर्षक पर्यटन केंद्र बनलेले आहे. नयनरम्य परिसर, सुंदर घाट रस्ता आणि मंदिराजवळील व्ह्यू पॉइंट्स हे सध्या पर्यटकांसाठी सेल्फी आणि सुंदर फोटोग्राफीचे मुख्य आकर्षण बनले आहेत.

# २२३- राहुरी या विधानसभा मतदारसंघा चे मतदार यादीचा विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम SIR चे मुदतीच्या् आगोदर १००% कामकाज पूर्ण

**राहुरी (समर्थ गांवकरी)**

मा. भारत निवडणूक आयोग व मा. मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचे निर्देशानुसार मतदार यादीचा विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम SIR (Special Intensive Revision) अंतर्गत मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (BLO) ३०/०६/२०२६ ते १७/०८/२०२६ या कालावधीत घरोघरी भेटी देऊन मतदार यादीचे पुनरिक्षण करीत आहेत. २२३ राहुरी विधानसभा मतदारसंघामध्ये राहुरी, पाथर्डी व नगर भागातील एकूण ३७४ मतदान केंद्र समाविष्ट आहेत. मतदारसंघाची एकूण मतदार संख्या ३,२९,८९३ इतकी असून त्यामध्ये स्त्रीम मतदार १,७०,११९ व पुरुष मतदार १,५९,७७२ तसेच तृतीय पथी २ इतके आहेत.

मा. डॉ. पंकज आशिया, जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अहिल्युनगर यांचे मार्गदर्शनाखाली व श्री. अनुपसिंह यादव, मतदार नोंदणी अधिकारी (२२३ राहुरी विधानसभा मतदारसंघ) तथा उपजिल्हा धिकारी (पुनर्वसन) अहिल्या६नगर तसेच यांचे नेतृत्वाखाली मतदार यादीचे पुनरिक्षणाचे काम पूर्ण करण्यात आले आहे. या यशामध्ये अहोरात्र काम करणा–या मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (BLO) यांचा सिंहाचा वाटा आहे.

SIR प्रक्रियेतील कामकाज –

१) EF डिजिटायझेशन पूर्ण झालेले – २,९५,४६६ (८९.५६%),

२) Uncollectable EF– ३४,४२७ (१०.४४%),

३) No Mapping–१९ ,१४८ (५.८०%),

वरील कामकाज पूर्ण करण्यासाठी खालील अधिकारी यांनी मोलाचे योगदान दिले

अ) डॉ अमित पवार, सहायक मतदार नोंदणी अधिकारी २२३ राहुरी विधानसभा मतदार संघ तथा तहसिलदार राहुरी

ERO यांचे सहायक म्हणून नियुक्त पर्यवेक्षक, BLO यांचे सहायक म्हणून काम करणारे ग्राम महसूल अधिकारी, शिक्षक, केंद्रप्रमुख, महसूल सेवक, पोलीस पाटील, आशा सेविका, अंगणवाडी सेविका, तसेच सर्व शासकीय कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी/ऑपरेटर, संकलन टिम, IT टिम यांच्या मदतीने हे काम पूर्ण होऊ शकले.

दिनांक १७/०८/२०२६ पर्यंत पुढीलप्रमाणे कामकाज होणार आहे.

अ) BLO स्तरावर १) Uncollectable EF ची फेरपडताळणी करणे (Reverification)

२) Unmapped मतदारांचे मॅपिंग करण्याचा प्रयत्न करणे.

३) nomalies दूर करणे,

ब) ERO, ERO स्तरावर डिजिटाइझ झालेल्या EF ची तपासणी करणे.

अशा प्रकारे २२३ राहुरी विधानसभा म तदारसंघाचे SIR मतदार यादीचे विशेष सखोल पुनरिक्षण कामकाज मुदतीच्या, आगोदर १००% पूर्ण झालेले आहेत.

